## निशाणी क्र. १३ खाली आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे ति-हाईत इसमांस दाव्यात सामील करणेसाठी व आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी अर्ज केला आहे.

२. अर्जातील संक्षिप्त कथन असे की, वादीने प्रतिवादी यांचे विरूध्द जाहीर ठराव होवून मिळणेचा व निरंतर ताकीदीचा दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात प्रतिवादी क्र. १ हे ता. ०३.०५.२०२४ रोजी मयत झालेले असून, प्रतिवादी क्र. १ चा मुलगा श्रीकांत बाळासो घाडगे यांनी प्रतिवादी क्र. १ कडून कुलमुखत्यारपत्र घेवून बेकायदेशीरित्या ता. १६.०४.२०२४ रोजी खरेदीदस्त क्र. १४१६/२०२४ ने दाव्यात नमूद मिळकत ही सागर बबनराव तारापूर यांना विक्री केलेली आहे. त्याआधारे सागर बबनराव तारापूरकर हे ७/१२ पत्रकी त्यांचे नावाची नोंद करण्याचा प्रयत्न करीत आहेत व मिळकतीमध्ये वादीचे कब्जा वहिवाटीस हरकत अडथळा करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे सदर दाव्याकामी ति-हाईत इसम सागर बबनराव तारापूरकर यांना आवश्यक पक्षकार करणेसाठी प्रस्तुतचा अर्ज केला आहे. त्याप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगीची विनंती करत आहे. सदर दुरूस्ती पुढीलप्रमाणे

प्रतिवादी क्र. "५. श्री. सागर बबनराव तारापूरकर,
वय- ३६, धंदा- शेती,
रा. ६४१, कोळी गल्ली, सरकारी दवाखान्याजवळ,
पंढरपूर, ता. पंढरपूर. जि. सोलापूर.

३. तसेच, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १ हे ता. ०३.०५.२०२४ रोजी मयत असलेने त्यांच्या नावापुढे "मयत वारस"असे नमूद करून त्यापुढे अर्जात नमूद केलेप्रमाणे त्यांचे कायदेशीर वारस १अ ते १ड यांची नावे लिहिण्यास परवानगी असावी अशी विनंती केली आहे.

४. तसेच, प्रस्तुत अर्जात नमूद केलेप्रमाणे, मुळ दाव्यातील दावा कलम ६ नंतर "६अ", दावा कलम ७ नंतर "७अ" व दावा कलम ९ ब नंतर "९ब-१" असे परिच्छेद नव्याने लिहिणेस परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

५. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविणत आले. परंतु आजतागायत प्रतिवादींनी आपले म्हणणे अभिलेखावर दाखल केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींच्या म्हणण्याविना चालविण्यात आला.

६. प्रस्तूतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरूध्द जाहीर ठराव होवून मिळणेचा व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादीच्या कथनांप्रमाणे सदर दाव्यात प्रतिवादी क्र. १ हा मयत असून प्रतिवादी क्र. १ चा मुलगा श्रीकांत घाडगे यांनी दावा मिळकत ता. १६.०४.२०२४ रोजी बेकायदेशीररित्या खरेदीदस्त क्र. १४१६/२०२४ ने ति–हाईत इसम सागर बबनराव तारापूरकर यांना विक्री केली आहे. सदर कथनाच्या पुष्ठयर्थ वादीने सदर खरेदीदस्ताची सही शिक्क्याची प्रत निशाणी क्र. १६ सोबत दाखल केली आहे. सदर खरेदीखताचे अवलोकन केले असता, लिहून घेणार म्हणून सागर बबनराव तारापूरकर असे नाव नमूद आहे. यावरून सदर इसमाने दावा मिळकतीचे खरेदीखत करून घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर दाव्यासंदर्भाने सदर इसम आवश्यक पक्षकार असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यास दाव्याकामी पक्षकार म्हणून सामील करणेस कोणतीही हरकत दिसून येते नाही.

७. तसेच, एकुणच नियोजित दुरुस्तीचे स्वरुप पाहता सदर दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची दिसून येत असून त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होत नाही. परिणामतः प्रतिवादीच्या न्यायहक्कावर गदा येत नाही. दाव्याचा वाद विषय स्थावर मिळकतीबाबत असल्याने तो पुर्णतः गुणदोषावर निर्णीत होणे आवश्यक आहे. नियोजीत दुरुस्तीतील कथने तांत्रीक स्वरुपाची असल्यामुळे तसेच उपरोक्त सर्व कारणांमुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे योग्य व परिणामकारक न्यायासाठी आवश्यक आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायप्राप्त होईल. न्यायाचे कारणास्तव मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने १४ दिवसाच्या आत मागणीप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत दाव्यात दाखल करावी.

(न्यायालयात घोषीत करण्यात आले.)

सही/-

**(ए. एस. सोनवलकर )**

दि. ०१/०७/२०२४.

५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | M. P. Gheradi. |
| Court | - | $5^{th}$ Jt. CJJD & JMFC, Pandharpur. |
| Date of Judgment/Order | - | 01/07/2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 03/07/2024 |
| Judgment/Order uploaded on | - | 05/07/2024 |